● सोमवार, दि. १६ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १३८ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ | 8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

### मंत्रिमंडळविस्तारात ३३ कॅबिनेट सहा राज्यमंत्र्यांचा शपथविधी

# जालना जिल्ह्यात एकही आमदार मंत्रिपदाच्या लायक नाही का? शिंदेनी शब्द फिरविला; फडणवीस विसरले लोणीकरांचे कार्य?

**जालना । प्रतिनिधी** - नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने बहुमत मिळवलं आहे. राज्यात एकूण २८८ जागांपैकी तब्बल २३५ जागा महायुतीने जिंकल्या आहेत. निवडणुकीच्या निकालानंतर १२ दिवसांनी राज्यात महायुतीने सत्ता स्थापन केली. त्यानंतर १० दिवसांनी मंत्रिमंडळ विस्तार झाला. रविवार (१५ डिसेंबर) रोजी नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा विस्तार झाला

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी ३३ मंत्री व ६ राज्यमंत्र्यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. ऐतिहासिक राजभवनाच्या हिरवळीवर शपथविधीचा सोहळा झाला. समारंभास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची उपस्थिती होती. समारंभास केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची विशेष उपस्थिती होती.

यापूर्वी देखील राज्यात महायुतीचं सरकार होतं. मात्र, नव्या सरकारमध्ये काही नवे चेहरे पाहायला मिळणार आहेत. नव्या सरकारमध्ये भाजपाने नऊ, शिवसेनेने (शिंदे) सहा व राष्ट्रवादीने (अजित पवार) पाच नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.


जालना जिल्ह्याला मात्र, फडणवीसांनी जाणूनबुजून टाळले की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबई, कोकण, बीड, छत्रपती संभाजीनगर आदी विविध जिल्ह्यातील दोन-दोन आमदारांना फडणवीसांनी आपल्या मंत्रिमंडळात स्थान दिलेले आहे. जालना जिल्ह्यातील एकाही आमदाराला मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने जालनेकरांमधून नाराजीचा सूर पहायला मिळत आहे. जिल्ह्यात एकही आमदार मंत्रिपदाच्या लायक नाही का? तसेच प्रचारादरम्यान एकनाथ शिंदे यांनी जालनेकरांना मंत्रिपदाबाबद दिलेला शब्द फिरवला असून देवेंद्र फडणवीस हे बबनराव लोणीकर पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री असतांना केलेले कार्य विसरले की काय हा ही मोठा प्रश्न आहे.

जालना जिल्ह्यातील परतूर विधानसभा मतदार संघाचे आमदार बबनराव लोणीकर यापुर्वी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री राहिलेले आहे. त्या काळात त्यांनी भरीव कामगिरी केलेली आहे. खुद्द देवेंद्र फडणवीस यांनीही मंत्री म्हणून लोणीकर यांनी केलेल्या कार्यबद्दल त्यांची वाहवा केलेली आहे. फडणवीसांची वॉटरग्रीड योजना असो व मोदींचे स्वच्छ भारत मिशन बबनराव लोणीकरांनी जीव ओतून काम केलेले अवघ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. त्यांनाही मंत्री मंडळात स्थान न मिळाले नाही ही आश्चर्याची बाब आहे. गेल्या अडीच वर्षांच्या काळात एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातही बबनराव लोणीकर यांना मंत्रिपदापासून दूर ठेवण्यात आले होते. त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. यावेळी देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते त्यांना बबनराव लोणीकर यांच्या कार्याची माहिती आहे. आता पुन्हा फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर जालना जिल्ह्याला बबनराव लोणीकर यांच्या रुपाने मंत्रीपद मिळेल व हक्काचा व जिल्ह्यातील पालकमंत्री


बबनराव लोणीकर


अर्जुनराव खोतकर


हिकमत उढाण


संतोष दानवे


नारायण कुचे

मिळेल अशी आशा लागून राहिली होती. मात्र, आजच्या मंत्रिमंडळ विस्तारातून ती आशा मावळली आहे.

जालना जिल्ह्यात भाजपाचे बदनापूर मतदार संघातून आ. नारायण कुचे, भोकरदन मतदार संघातून संतोष दानवे यांनी विजयाची हॅटट्रीक केली आहे. संतोष दानवे हे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे पुत्र आहेत. बबनराव लोणीकरांना जर संधी द्यायची नव्हती तर जालना जिल्ह्यातून संतोष दानवे यांचा नावाचा विचार करता आला असता किंवा नारायण कुचे यांच्या रुपाने तिसरा पर्यायही भाजपाकडे होता. मात्र, इतर जिल्ह्याला झुकते माप देत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी जालना जिल्ह्याला डावलले आहे. त्याच प्रमाणे शिवसेनेही जालना जिल्ह्याचा विचार केला नाही. निवडणुक खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अर्जुनराव खोतकर यांच्या प्रचारसभेत 'तुम्ही बहुमतांनी विजयी करुन द्या मी मंत्रीपद देतो' असा शब्द जालनेकरांना आझाद मैदान येथील प्रचारसभेत दिला होता. आता खोतकरांना विजय मिळाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द फिरवला असल्याची मानसिकता जालनेकरांची झालेली आहे. दुसरीकडे शिवसेनेचे आमदार हिकमत उढाण यांनी माजी मंत्री राजेश टोपे यांचा पराभव केला. गेल्या पाच टर्म राजेश टोपे यांचे एकहाती वर्चस्व घनसावंगी मतदार संघावर आहे. आणि अशा राष्ट्रवादी काँग्रेसच्या धाकड मंत्र्यांची विकेट काढल्यानंतर हिकमत उढाण हे मंत्रिमंडळात समावेश होण्याची शक्यता वर्तविली जात होती. मात्र, येथेही एकनाथ शिंदे यांनी दुर्लक्ष केले. फडणवीस-शिंदे यांनी जालना जिल्ह्याला टाळण्यामागे नेमके कारण काय? असा प्रश्न उपस्थित होत असला तरी जिल्ह्यात मात्र, उलटसुटल चर्चांना उधाण आले आहे.

आता अडीच वर्षांसाठी मंत्रिपद असणार असे सांगण्यात येत आहे. मात्र, आता नाही तर नंतर काय देणार? ठेंगाच. जालना जिल्ह्यातून पाचही विधानसभा मतदार संघातून महायुतीचे शिलेदार आमदार असतांना जिल्ह्यात एकालाही मंत्रिपदाच्या लायक देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांनी समजले नाही. ही मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

भाजपाकडून शपथविधीत कॅबिनेट मंत्रीपदी चंद्रकांत पाटील, मंगलप्रभात लोढा, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, गणेश नाईक, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, अतुल सावे, संजय सावकारे, अशोक उईके, आकाश फुंडकर, जयकुमार गोरे, शिवेंद्रराजे भोसले, नितेश राणे, जयकुमार रावल तर राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मेघना बोर्डीकर, पंकज भोयर यांचा समावेश आहे.

शिवसेनेने कॅबिनेटमंत्रीपदी गुलाबराव पाटील, दादा भूसे, संजय राठोड, उदय सामंत, शंभूराज देसाई, संजय शिरसाट, प्रताप सरनराईक, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर तर राज्यमंत्री म्हणून आशिष जैस्वाल, योगेश कदम यांना संधी दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमधील नऊ आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली यात हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव, इंद्रनील नाईक, माणिकराव कोकाटे यांचा समावेश आहे.

युवा आदर्श

**मत पेटी ...**

उभी राही आंदोलने
खुश झाली मतपेटी
दिवस येणारं आपले
मद मस्त आशे पोटी
लक्ष वेधावे लोकांचे
राजकारणी हातोटी
टाकी भरगच्च जरी
बंद करून ठेवे तोटी
प्रत्येक निकालानंतर
ईव्हीएमची कसोटी
कपडे नेहमी उतारून
टाईट ठेवतात लंगोटी
ठोस पुरावे न हातात
पळता मृगजळांपाठी
आत्ता होई फाटाफूट
पाण्यावर मारी काठी
चित्र विचीत्र हरकती
राजकारण अति डर्टी
गढूळल्या मना वरती
हळूवार फिरवा तुरटी
सारे चित्र बदलू जाई
जनता जर उभी पाठी
येणारं नाही आवाज
देवाच्या हाती काठी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### कायदे विषयक व विविध योजनांचा महामेळावा उत्साहात संपन्न

# भारतीय संविधानानुसार देशातील जनता हीच सर्वोच्च - न्यायमुर्ती मोरे; भारतीय न्याय व्यवस्थेत नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी** - भारतात लोकशाहीचे राज्य अस्तित्वात आहे. लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजेच लोकशाही होय. प्रत्येक व्यक्तीला मुलभूत हक्क प्रदान करण्यात आले असून हे हक्क अबाधित ठेवण्याचे कार्य मा.सर्वोच्च न्यायालयाकडून केले जाते. भारतीय संविधानानूसार देशातील जनता हीच सर्वोच्च मानली जाते. असे प्रतिपादन जालना जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती तथा मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती संदीपकुमार मोरे यांनी केले.





जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा रविवार, दि. १५ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी येथे पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, अतिरिक्त पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे, जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड बाबासाहेब इंगळे, ॲड विकास पिसुरे, ॲड दीपक शिवतारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती संदीपकुमार मोरे म्हणाले की, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशान्वये जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित

पान २ वर

# आमदार संतोष दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त टेंभुर्णीत स्वच्छता मोहीम

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - सर्वात मोठी ग्राम पंचायत म्हणून टेंभुर्णी जालना जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. या टेंभुर्णीत आमदार संतोष दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. ही स्वच्छता मोहीम दररोज सुरु राहणार आहे. रविवार (दि १५) रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हनुमान चौक खालचे बस स्टँड, तसेच धनगर गल्ली आदी भागात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत जिल्हा परिषद









सदस्य शालिग्राम म्हस्के पाटील, सरपंच गौतम मस्के, उपसरपंच शिवाजी मुळे, माजी उपसरपंच पाचे, भिकन पठाण, शंकर भागवत, ज्ञानेश्वर उखर्डे, राजू खोत, संजय राऊत, गजानन राऊत, गजानन अंधारे, किशोर कांबळे, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, ग्रामपंचायतचे कर्मचारी, ग्रामपंचायतचे अधीक्षक विक्रम उखर्डे, अजित दिगंबर भिसे, बाबासाहेब जमदाडे, सुनील भाले, स्वच्छता निरीक्षक गायमुखे यांच्यासह सर्व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

टेंभुर्णीचे सरपंच प्रतिनिधी गौतम मस्के यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले ही स्वच्छता मोहीम दररोज राबविण्यात

पान २ वर

संपादकीय पान

## मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले विनोदी स्वप्न

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज स्मृतिदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षांच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूम धडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या त्रुटी पुर्ततेसाठी आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येते. योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नियमानूसार देय असलेली रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न खात्यात जमा केली जाते. ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी आहे त्यांना लाभ देण्यात आलेला नाही. तरी सन २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४ या वर्षात अर्ज सादर केलेल्या अर्जातील त्रुटी दुरुस्तीची कार्यवाही सुरु असून संबंधित विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुन त्रुटीची पुर्तता दि.३१ डिसेंबर २०२४ पर्यंत करावी, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त अनंत कदम यांनी केले आहे.

# बनावट औषधांचा विषारी डोस

आजारपणात शरीराला तंदुरुस्त करणारे आणि गंभीर स्थितीत रुग्णाला जीवरक्षक ठरणारी औषधे नेहमीच संजीवनी ठरत असतात. तथापि,आरोग्याची जीवनदायिनी ठरणारी औषधे ही नफा कमावण्याचे साधन ठरू लागली,तो एक प्रकारे माणसाच्या जीवाशी खेळच म्हणावा लागेल.

सध्या राज्यभरात अनेक ठिकाणी बनावट औषधांच्या विक्रीचा सुळसुळाट सुरू झाला आहे.त्यामुळे औषधे खरेदी करताना नागरिकांना सावधानता बाळगावी,असे आवाहन अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (ऋऊ) केले आहे.राज्यातून तसेच परराज्यातूनही बनावट औषधे विक्रीसाठी येत असल्याची माहिती समोर आल्याचे अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (ऋ्र रपव उ्रीस वाळपर्ळीीीरींळेप) यांनी म्हटलंय. नागरिकांनी औषधांची खरेदी करताना सावधानता बाळगावी असे जरी प्रशासनाने म्हटले असले तरी नागरिकांनी नेमकी काय काळजी घ्यावी?याबाबत अन्न आणि औषध प्रशासन विभागाने काहीही सांगितले नाही.कोणते औषध खरे आणि कोणते औषध खोटे ते कसे ओळखावे याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती प्रशासनाने दिलेली नाही.त्यामुळे औषध खरेदी करताना नागरिकांची होणारी फसवणूक नेमकी थांबणार कशी? हा प्रश्न अनुत्तरीत आहे.बनावट औषधांचे रॅकेट हे खूप मोठे असून ते आपल्या भारतात अथवा महाराष्ट्रातच नाही तर आतंरराष्ट्रीय देशातही मोठ्या प्रमाणावर चालू आहे.त्याचे पाळेमुळे ही खूप खोलवर गेलेली आहेत.अनेक औषध आस्थापनांचा व्यवसाय कोट्यवधी रुपयांमध्ये असून त्यांनी बनावट औषध माफियांची प्रचंड मोठी साखळी सिद्ध केली आहे. तसेच बनावट औषधे बनविणाऱ्या आस्थापंनांमुळे काही उत्तम दर्जाचे औषधे बनविणाऱ्या व प्रामाणिक काम करणारे आस्थापने बदनाम होताना दिसत आहे.तरी महाराष्ट्रात काही ठिकाणी फक्त संबंधित कंपन्यांचे औषधे उपलब्ध आहेत पण प्रत्यक्षात ती कंपनीचं अस्तित्वात नसल्याचे धक्कादायक प्रकार ही समोर आले आहेत.औषधांच्या वेष्टनांची हुबेहूब नक्कल करून बनावट औषधे बाजारात विकली जात आहेत.उत्तरेतील राज्यांनी औषध उत्पादकांना अधिक सवलती दिल्या.परिणामी हिमाचल प्रदेश,उत्तराखंड,उत्तरप्रदेश,बिहार, मिझोराम आदी राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात औषध कारखाने उभे राहिले आहेत.त्यांवर अन्न आणि औषध प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नाही.त्यामुळे बनावट औषधांच्या निर्मितीला मोकळे रान मिळाले आहे. अन्य राज्यांत ही औषधे मोठ्या प्रमाणात खरेदी झाल्याने बनावट औषधांचे जाळे महाराष्ट्रासह अन्य



राज्यांतही पसरले आहे.

विविध आजारांचे व्यवस्थापन करणे आणि गंभीर जीवघेण्या आजारांवर उपचार करणे यासारख्या गोष्टींसाठी जगभरातील अनेक लोक असंख्य औषधांवर अवलंबून असतात.तरीही लोक नकळतपणे दररोज बनावट औषधांचे सेवन करतात,अगदी सु-नियमित आरोग्य सेवा प्रणाली असलेल्या विकसित देशांमध्येही. त्यांनी ज्या गोष्टींवर विश्वास ठेवला पाहिजे त्या गोष्टीसाठी ते आपला जीव धोक्यात घालतात.परंतु हे प्रश्न कायम आहेत.बनावट औषधे म्हणजे नेमके काय? बनावट औषधांची समस्या किती मोठी आहे?आणि कोणाला धोका आहे?बनावट औषधे काय आहेत?बनावट औषधे कायदेशीर ब्रँड-नावाच्या औषधांसारखी दिसण्यासाठी तयार केली जातात आणि पॅकेज केली जातात परंतु त्यात लेबलवर सूचीबद्ध केलेल्या सक्रिय घटकांपैकी कोणतेही घटक नसतात.बेकायदेशीर पुरवठा साखळीतील बनावट औषधे संशयास्पद रुग्णांसाठी गंभीर संभाव्य धोका निर्माण करतात.काही प्रकरणांमध्ये ही बनावट औषधे आवश्यक उपचारात्मक मूल्य प्रदान करत नाहीत कारण त्यांच्यात सक्रिय घटक नसतात.बनावट औषधांचे सेवन केल्याने व्यक्ती,समुदाय आणि एकूणच जागतिक सार्वजनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (थक्ज) नुसार,कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये दर १० पैकी एक औषध अयशस्वी ठरते कारण ती निकृष्ट किंवा खोटी आहे.यामुळे आरोग्यसेवेवरील जनतेचा विश्वास तर कमी होतोच,पण त्यामुळे टाळता येण्याजोगे मृत्यूही होतात.काही बनावट औषधांमध्ये वास्तविक प्रतिजैविक किंवा अँटीव्हायरल असतात परंतु उत्पादन लेबलवर सूचीबद्ध केलेल्या डोसपेक्षा खूपच कमी डोस असतात.रोगाचा पूर्णपणे उपचार करण्यासाठी हे पुरेसे नाही आणि ते रोगजनकांना उत्परिवर्तन आणि पसरण्याची संधी देऊ शकते,जे प्रतिजैविक-प्रतिरोधक संक्रमणांच्या वाढत्या सार्वजनिक आरोग्याच्या धोक्यात योगदान देते.बनावट औषधांमध्ये अशी औषधे देखील असू शकतात जी ती नसावीत तेथे दिसून येतात,ज्यामुळे ओव्हरडोज आणि मृत्यू ही होण्याची शक्यता असते. निकृष्ट दर्जाची विरुद्ध खोटी विरुद्ध नोंदणी नसलेली औषधे बेकायदेशीर औषधांच्या अनेक श्रेणी आहेत.२०१७ मध्ये थक्ज ने नकली औषधे या सामान्य शब्दाच्या जागी सबस्टँडर्ड आणि खोटी वैद्यकीय उत्पादने या संज्ञा सादर केल्या आणि अशी उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचू नयेत यासाठी जागतिक प्रयत्नांवर लक्ष केंद्रित केले. पण ते हवे तसे यशस्वी होताना दिसले नाही.निकृष्ट औषधे उदाहरणार्थ अधिकृत वैद्यकीय उत्पादने आहेत जी निर्मात्याची गुणवत्ता मानके किंवा वैशिष्ट्यांची पूर्तता करण्यात अयशस्वी ठरतात.ज्यामध्ये कालबाह्य झालेल्या किंवा योग्यरित्या संग्रहित न केलेल्या औषधांचा समावेश होतो. दुसरीकडे,खोटी औषधे ही वैद्यकीय उत्पादने आहेत जी जाणूनबुजून फसवणूक करून त्यांची ओळख,रचना किंवा स्त्रोत चुकीच्या पद्धतीने सादर करतात.ज्यात चोरी आणि पुनर्विक्री केलेली अधिकृत औषधे,ब्रँड-नावाच्या उत्पादनांसारखी दिसण्यासाठी पुन्हा पॅक केलेली अनधिकृत औषधे,किंवा बनावट औषधे ज्यात उत्पादन लेबलवर सूचीबद्ध सक्रिय घटक समाविष्ट नाहीत.तिसरा गट म्हणजे नोंदणी नसलेली/परवाना नसलेली औषधे जी वैद्यकीय उत्पादने आहेत जी बाजारात विकली जातात जिथे त्यांचे मूल्यांकन केले गेले नाही किंवा त्या देशात किंवा प्रदेशातील आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांना मान्यता दिली नाही.यापैकी काही निकृष्ट खोटी किंवा नोंदणीकृत नसलेली औषधे रोगावर उपचार करण्यासाठी प्रभावी ठरू शकतात,परंतु नियमनाचा अभाव त्यांना अविश्वसनीय,असुरक्षित आणि एक गंभीर समस्या बनवते ज्यासाठी सतर्क लक्ष आवश्यक आहे.

**बनावट औषधे: एक जागतिक समस्या**

अनेक दशकांपासून आपल्या भारतात अथवा महाराष्ट्र राज्यात तच नाही तर विकसनशील आणि कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये ही बनावट औषधे आणि त्यांचे परिणाम ही समस्या आहे.जिथे बहुतेक लोकांना प्रिस्क्रिप्शन औषधे,लसी आणि विकसित देशांमध्ये सहज उपलब्ध असलेल्या वैद्यकीय उपकरणांमध्ये प्रवेश नाही.काही ठिकाणी शिथिल नियमांसह या पोकळीमुळे बनावट कंपन्यांचे मार्केट तयार झाले आहे. आता ऑनलाईन फार्मसीच्या उदयामुळे,जगभरातील देश बनावट औषधे आणि त्यांचे परिणाम यांच्याशी झुंज देत आहेत.भारतासह अनेक विकसित देशांमध्ये ही बहुतेक निकृष्ट आणि खोटी औषधे ऑनलाईन खरेदी केली जातात.बरेच लोक असा विश्वास करतात की हे धोकादायक बनावट केवळ कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये धोका आहेत,परंतु तसे नाही.बनावट औषधे विकसित देशांमध्येही फार पूर्वीपासून आहेत. आणि आता बाहेरील देशांबरोबरच भारतातही आणखी उपलब्ध आहेत कारण कोविड १९ मुळे साथीच्या आजारामुळे ऑनलाईन खरेदी वाढली आहे.

**बनावट औषधे आणि त्यांचे परिणाम समजून घेणे**

बनावट औषधे बऱ्याचदा ते भासवत असलेल्या औषधांसारखी दिसतात आणि चव घेतात,परंतु ती घेणे सुरक्षित नसते.आणि वैध फार्मसी व्यतिरिक्त कोठूनही औषधे खरेदी केल्याने एखाद्याचे आरोग्य धोक्यात येऊ शकते.नकली औषधे आता जगभरात कोठेही उपलब्ध होत आहेत,ज्यामुळे प्रत्येकासाठी वाढता धोका आहे.परंतु बनावट औषधे विकत घेण्याचा आणि वापरण्याचा धोका लोकांना समजून घेणे महत्त्वाचे आहे.शेवटी ज्ञान ही शक्ती आहे.

आपल्याला महाराष्ट्रात विविध शासकीय रुग्णालयांमध्ये बनावट औषधे मोठ्या प्रमाणावर सापडली असून ही एक मोठी चेन आहे. दरम्यान याबाबत,जरी प्रशासनाने औषधांची खरेदी करताना नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले असले तरी,काळजी कशी घ्यावी याबाबत काहीही सांगितले नाही.त्यामुळे बनावट औषधांच्या विक्रीचा सुळसुळात थांबणार कधी?हा प्रश्न याठिकाणी उपस्थित होत आहे.आपल्या भारत देशात बनावट व भेसळयुक्त औषध निर्मिती करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई व्हावी यासाठी कडक कायदे उपल्ब्ध आहेत,पण तरीही या बनावट औषधे निर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही.त्यामुळे आपल्याला ही समजून येईल ही चेन किती मोठी आहे.तरी आता रुग्णांनी सुद्धा औषधे खरेदी करताना काळजी घेतली पाहिजे.



औषधे घेऊन ती आपल्या डॉक्टरांना दाखवणे ही आपली सुद्धा जबाबदारी आहे.

**केतन दत्ताराम भोज**
**कार्यकारिणी सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**
**भ्रमणध्वनी - ८८७९५४४५४०**

# समाजाची सृजनशीलता, वैचारिकतेसाठी वाचन संस्कृती जीवंत ठेवणे काळाची गरज- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे । प्रतिनिधी -** समाजाला सृजनशील आणि वैचारिक ठेवण्यासोबतच सामाजिक मूल्ये जोपासण्यासाठी वाचन संस्कृती जीवंत ठेवणे ही काळाची गरज असून त्याकरीता अशा पुस्तक महोत्सवांचे आयोजन करणे आवश्यक आहे. हा पुस्तक महोत्सव पुण्यापुरताच मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे आयोजन केले पाहिजे, यासाठी शासन आपल्या पाठीशी नेहमी उभे राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नॅशनल बुक ट्रस्टच्यावतीने फर्ग्युसन कॉलेज येथील मैदानावर आयोजित 'पुणे पुस्तक महोत्सवा'चे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला खासदार मेधा कुलकर्णी, आमदार सर्वश्री चंद्रकांत(दादा) पाटील, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, अमित गोरखे, हेमंत रासने, शंकर जगताप, आमदार माधुरी मिसाळ महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टचे विश्वस्त आचार्य पवन त्रिपाठी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, इतिहासात ग्रंथांचे महत्त्व चिरकाल आहे. आपली ग्रंथसंपदा ज्ञान किती थोर आहे हे सहाव्या शतकातील नालंदा विश्वविद्यालयाच्या ग्रंथसंपदेतून दिसून येते. त्याकाळी नालंदा विश्वविद्यालयात सर्व विद्या शाखांचा अभ्यास करण्यात येत असे. बख्तियार खिलजी याने नालंदा विश्वविद्यालयावर हल्ला केला आणि तेथील ग्रंथसंपदेला आग लावली ज्यामध्ये तेथील ग्रंथसंपदा तीन महिने जळत होती.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, ग्रंथांशी आपले नाते खूप जुने असून ते चिरकाल टिकले आहे. भारतीय संस्कृती जगातल्या सर्वात जुन्या संस्कृतीपैकी आहे. जगातील इतर संस्कृती संपल्या असल्या तरीही भारतीय संस्कृती चिरंतर चालू आहे. सर्व दिशांनी येणारे ज्ञान ग्रहण केले पाहिजे, अशी शिकवण आपल्या संस्कृतीने दिली आहे. म्हणूनच ग्रंथांशी आपले नाते अतूट राहिले आहे. डिजिटल युगातही आपले ग्रंथ आणि विचार टिकून राहणार आहेत. आपली ग्रंथसंपदा आणि विचार कधीही संपू शकत नाही. कोणतेही पुस्तक आता तंत्रज्ञानाच्या मदतीने विविध भाषांमध्ये सहज वाचता येणे शक्य झाले आहे. तंत्रज्ञानाने ज्ञानाची दारे उघडी केली आहेत. आपली वाचन संस्कृती जपण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे.

पान १ वरुन

## भारतीय संविधानानुसार ...

करण्यात आला आहे. समाजातील आर्थिक दुर्बल घटकासह शेवटच्या लाभार्थ्यांस न्याय मिळवून देण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण काम करत असते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत विविध सेवा विधी सहाय्यासाठी गरजूना उपलब्ध करून देण्यात येते. तसेच राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा गरजूंना लाभ मिळावा यासाठी निकष लावले जातात. तरी खऱ्या लाभार्थ्यांना विविध योजनाचा लाभ मिळवून देणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. आज विविध विभागाचे स्टॉल कार्यक्रमाच्या ठिकाणी उभारण्यात आले असून विविध योजना जाणून घेवून कोणत्या योजनेच्या निकषात आपण पात्र आहोत याची परिपूर्ण माहिती जाणून घेत त्या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते म्हणाल्या की, सर्व घटकांना न्याय मिळाला पाहिजे हा विधी सेवा प्राधिकरणाचा मुख्य उद्देश आहे. दुर्बल घटक, गरीब व मागासवर्गीयांना न्याय मिळवून देण्यासाठी विधी सेवा प्राधिकरणाकडून विविध योजना राबविण्यात येत असतात. लोकांमध्ये कायदेविषयक जनजागृती व्हावी यासाठी महिन्याभरात दोन ते तीन वेळा शिबिर आयोजित करण्यात येत असते. विधी सेवा प्राधिकरणामार्फत लोकन्यायालयात मोटार अपघात, कौटुंबिक प्रकरणे तडजोडीने मिटविली जातात. असेही त्यांनी प्रास्तविकात सांगितले.

शासनाच्या विविध योजनांचा लाभार्थ्यांना तात्काळ लाभ मिळावा हाच या शिबिराचा हेतू आहे. राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाकडून वेळोवेळी निर्देश प्राप्त होतात. त्यामुळे योजना राबवितांना प्रशासनाकडून चुका होत नाहीत. कार्यक्रमात उभारणी करण्यात आलेल्या स्टॉलच्या ठिकाणी कल्याणकारी योजना गरजूंना मिळण्यासाठी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. सर्वांनी याचा लाभ घ्यावा. भारतीय न्याय व्यवस्था प्रगत असून यात नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण केले जाते. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी केले.

कार्यक्रमस्थळी विविध शासकीय योजनाची माहिती देणाऱ्या विविध विभागांच्या स्टॉलची उभारणी करण्यात आली होती. या स्टॉलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास उपस्थित असलेले नागरिक स्टॉलवर चौकशी करून आपल्याला कोणत्या योजनेचा लाभ घेता येईल. याची माहिती जाणून घेतांनी दिसून येत होते. यावेळी रमाई आवास योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, माझी लाडकी बहीण योजना, लाडकी लेक योजना, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान, वैयक्तिक सिंचन विहीर योजना, मागेल त्याला शेततळे योजना, तुती लागवड योजना, संजय गांधी निराधार योजना, आयुष्मान कार्ड, श्रावणबाळ योजना, ई-शिधापत्रिका अशा विविध शासकीय योजनेच्या नूतन लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी अशासकीय संस्था जालना इनरव्हील क्लबच्या वतीने पिंपरखेड ग्रामपंचायतीस वॉकर, टॉयलेट चेअर, व्हील चेअर आणि बेड आदी साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिवाणी न्यायाधीश श्रीमती आर. व्ही.पाटील यांनी केले तर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, तहसीलदार योगिता खटावकर यांच्यासह विधीज्ञ, अधिकारी-कर्मचारी, लाभार्थी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## आमदार संतोष ...

येणार आहे. स्वच्छ आणि सुंदर असे टेंभुर्णी करण्याचा ग्रामपंचायतचा मानस असून जाफराबाद तालुक्यासह जालना जिल्ह्यात स्वच्छ सुंदर टेंभुर्णी करण्याचा आमचा मानस आहे. टेंभुर्णीकरांनी ग्रामपंचायतला यासाठी सहकार्य करावे असे आवाहनही म्हस्के यांनी केले आहे. स्वच्छता ही जीवनाचा संस्कार असून या संस्कारातूनच टेंभुर्णी पुढे जाईल असा विश्वासही गौतम म्हस्के यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलतांना व्यक्त केला आहे.

## नवभारत कनिष्ठ महाविद्याल व श्रीमती जेबीके विद्यालयाचा विद्यार्थी तेजस सोनाळकर यास स्केटिंग स्पर्धेत गोल्ड मेडल

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जेबीके विद्यालयाचा विद्यार्थी तेजस सोनाळकर याने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद, छत्रपती संभाजी नगर आणि रिले स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रीडा सप्ताह अंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेमध्ये श्रीमती जे बी के नवभारत उच्च माध्यमिक विद्यालय टेंभुर्णी येथील खेळाडू तेजस सोनाळकर याने गोल्ड मेडल प्राप्त केले. या यशाबद्दल त्याचे संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमीर, संस्थेचे सचिव सत्यनारायण सोनी, संस्थेचे कोषाध्यक्ष सुभाष राठी, संस्थेचे जेष्ठ संचालक रामनारायण काबरा, संस्थेचे जेष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, संस्थेचे माजी सचिव तथा ज्येष्ठ संचालक प्रेमसुख काबरा, संस्थेचे संचालक तथा माजी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संस्थेचे हैदराबाद निवासी संचालक राजीव काबरा, संस्थेचे संचालक दीपक काबरा, संस्थेचे संचालक माजी मुख्याध्यापक मधुकरराव निकम, संस्थेचे संचालक तथा माजी अधीक्षक विश्वनाथराव सांगोळे, संस्थेचे संचालक तथा उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, संस्थेचे संचालक प्रदीप मुळे, संस्थेचे संचालक प्रदीप काबरा, संस्थेचे सर्व विश्वस्त, प्राचार्य नंदकुमार काळे, पंजाबराव सोळंके, धनंजय पुराने, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, सखाराम बोरकर, विष्णू जाधव, कैलास भुतेकर, राजेश शेवाळे, रमेश इंगळे, भिवसन ससाने, संजय कुलकर्णी, राजेंद्र जगताप, रवींद्र मोरे, दिनकर उखर्डे, समाधान कांबळे, दत्ता उखर्डे, वासुदेव क्षीरसागर, आवटी मॅडम, पाटील मॅडम, भिलावेकर मॅडम, शेख मॅडम, कळंबे मॅडम, लंबे मॅडम, राजू डोमाळे, नागोराव देशमुख, डीजी तांबेकर, दीपक देशमुख, सर्व विद्यार्थी, यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.










## कर्मवीर भाऊराव पाटील वाचनालयातील अभ्यासिकेच्या विद्यार्थ्यांचा सत्कार




**जालना | प्रतिनिधी** - कर्मवीर भाऊराव पाटील वाचनालय रेवगाव ता जि जालना येथे आज डॉ. ऋषिकेश राजेश मोरे, यांची नेत्र चिकित्सा अधिकारी वाशिम येथे नियुक्ती झाल्या बद्दल आणि निलेश शंकर कदम यांची लिपिक जिल्हा न्यायालय जालना येथे निवडीबाबत सत्कार करण्यात आला, ही दोन्ही विद्यार्थी हे कर्मवीर भाऊराव पाटील वाचनालयातील अभ्यासिकेचे विद्यार्थी आहेत. ग्रंथालयाचेही नियमित वाचक सभासद आहेत. निलेश कदम यांनी आपल्या मनोगतात ग्रंथालय गावात असल्याने मला अभ्यासासाठी लागणारे पुस्तके मिळाली वाचून अभ्यास करू शकलो माझ्या यशात कर्मवीर भाऊराव पाटील वाचनालयचेही योगदान असल्याचे सांगून ग्रंथालयाचे अभार मानले. तसेच डॉ ऋषिकेश मोरे यांना कठोर मेहनत आणि अभ्यास करण्याचे अहवान उपस्थितांना केले, गावात होणाऱ्या सत्कार हा सर्व सत्कारापेक्षा मोठा सत्कार असल्याचे आणि गावकर्यांच्या प्रेमाची कायम आठवणीत राहील. असे म्हटले ग्रंथालयाचेही अभार मानले. कार्यक्र माच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयचे उपाध्यक्ष बाबुरावजी गोल्डे, संतोष राव मोहीते, पंचायत समिती सदस्य, शाम कदम, मा जिल्हा परिषद सदस्य, जालना, सुरेश मोरे, दामोदर हारकाळ, श्रीधर गोल्डे, सजय सरडे, विठ्ठल अप्पा कंजे, प्रभाकर मोरे, बंडू गायकवाड, अनिल पाखरे, रामराव कन्हाळे, लक्ष्मण मोरे, अनंथा लगडे, नामदेव गोल्डे, यांच्यासह गांवकरी अभ्यासिकेचे विद्यार्थी, वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल काशिनाथ गायकवाड यांनी केले या प्रसंगी मा. बाबुराव गोल्डे, मा. संतोष राव मोहीते, मा. अनिल पाखरे, सुरेश मोरे यांनी मार्गदर्शन केले.

## सव्वाचार लाखाच्या घरफोडीतील गुन्हेगारास अटक

### सपोनि सचिन खामगळ यांच्या टीमची उत्तम कामगिरी

**टेंभुर्णी | प्रतिनिधी** - येथील टेंभुर्णी पोलीस स्टेशनची धडाकेबाज कारवाई, सव्वाचार लाखाच्या घरपोडीतील गुन्हेगारास तपास करून उत्तम कामगिरी केलेली आहे. टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ आणि यांच्या टीमने ही तपास करून गुन्हेगारापर्यंत पोहोचून गुन्हेगाराची ओळख करून त्यास अटक केली आहे. सविस्तर वृत्त असे की, टेंभुर्णी पोलीस स्टेशन हद्दीतील डोलखेडा खुर्द येथील दिनांक ३१/ ८/ २०२४ रोजीच्या भगवान डोईफोडे यांच्या घरी घरपोडी करून, गुन्हेगाराने सव्वाचार लाखाचे कागदागिने व नगदी रुपये घेऊन चोरी केली होती. तक्रारीवरून टेंभुर्णी पोलीस स्टेशन मध्ये अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल झालेला होता. या कामी सचिन खामगळ यांची टीम यांनी अंगुली मुद्रा टीम, फॉरेन्सिक टीम जालना यांची मदत घेऊन आवश्यक ते पुरावे गोळा करून ही टीम गुन्हेगार आकाश उर्फ संतोष विष्णू रावळकर, वय वर्ष २४ राहणार हनुमान नगर, कुरा काकोडा तालुका मुक्ताईनगर जिल्हा जळगाव, यांनी ही घरपोडी केल्याचे शास्त्रोक्त पुरावे मिळाल्यामुळे, टीम गुन्हेगारापर्यंत पोहोचली. सदर आरोपीचा टेंभुर्णी पोलीस स्टेशन शोध घेत होती या टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या टीमला माहिती मिळाली की सदर आरोपी हा भुसावळ येथे आहे. सदर टीमचे नेतृत्व करीत असलेले सचिन खामगडे यांनी टीम तपास कामी भुसावळ येथे पाठवून आरोपीस अटक केली. सदर आरोपीस न्यायालयात दाखल केले असता त्यास तपास कामी दोन दिवसाचे पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. व सदर टीम हा तपास करीत आहे.ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, माननीय उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉक्टर गणपत दराडे, यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ,ल पोलीस उपनिरीक्षक रवी देशमाने, अंगुली मुद्रा विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिगंबर कठाळे, फिंगरप्रिंट तज्ञ राजेंद्र राव, गणेश वाघ, तसेच टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल मस्के, पोलीस नाईक गजेंद्र भुतेकर, पोलीस नाईक तिडके, पोलीस कॉन्स्टेबल माने, पोलीस कॉन्स्टेबल क्षीरसागर, पोलीस कॉन्स्टेबल बेडवाल, पोलीस कॉन्स्टेबल गावंदे, तसेच टेंभुर्णी पोलीस स्टेशन मधील सर्व पोलीस कर्मचारी यांनी विशेष कार्य करून ही कारवाई केली आहे.



## प्रवीण तोगडिया यांचा वाढदिवस व दत्त यात्रेनिमित्त रक्तदान शिबिर; ५१ दात्यांचे रक्तदान





**टेंभुर्णी | प्रतिनिधी** - येथील आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग यांचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री. हिंदुरुदय सम्राट. डॉ. प्रवीण भाई तोगडिया यांच्या जन्मदिवसानिमित्त व दत्त यात्रेनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले होते ह्या रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले

ऋषिकेश देशमुख, सुनील गरडवाल, प्रकाश इंगळे, दीपक वाघ, प्रमोद उखर्डे, विनोद वाघ, अमोल देशमुख, वैभव मगर, आकाश जाधव, कृष्णा आहेर, राज भाले, दीपक धनवई, योगेश इंगळे, बाळू देशमुख मेंबर, सागर इंगळे, संतोष देशमुख, सागर सपकाळ, विलास धनवई, राजू भागवत, बापू देशमुख, वेदांत धनवाई, सो मोनिका मनोज कामे, रुपेश सनासे, राज देशमुख, लक्ष्मण धारे, गजानन पिसे, गोपाल काठोळे, परमेश्वर पाचे, ज्ञानेश्वर ढवळे, कृष्णा उगले, समाधान देशमुख, अनिकेत उखर्डे, योगेश गडकर, उमेश सपकाळ, पवन उखर्डे, किशोर मुळे, मुकेश स्वामी, शांताराम काठोळे, योगेश शिराळे, प्रथमेश सपकाळ, बालाजी डोमाळे, गिरीश भागवत, सचिन उघडे, अण्णा मैंद, सचिन वाघ, मुकेश शर्मा, निशांत शिलारकर, सुनील जोशी, दत्ता पाचे, विलास जाधव, अविनाश देशमाने या ५१ दात्यांनी रक्तदान केले. तर रक्तदान शिबिरासाठी अविनाश देशमाने भारत बोराडे विनोद इंगळे पंकज काबरा शेखर आहेर बाळू आहेर सोहम आवटी विष्णू भागवत अक्षय गावंडे आकाश जाधव कृष्णा आहेर अमोल देशमुख यांनी परिश्रम घेतले.

# नायलॉन मांजाच्या बाबतीत पोलिस प्रशासन सज्ज; जनतेनेही तेवढीच तत्परता दाखवावी

दोर पतंगाची कापायची की आयुष्याची याला समजून घेण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे.कारण नायलॉन मांजाच्या बाबतीत सर्वांचेच सहकार्य आवश्यक आहे. तेव्हाच यावर अंकुश लावता येईल.यावर्षी सुध्दा मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्रात नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीवर बंदी आहे. तरीही आतापासूनच नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीला सुरूवात झाल्याचे दिसून येते.याच अनुषंगाने नागपूरसह राज्याच्या अनेक भागात पोलिस प्रशासनाने नायलॉन मांजा खरेदी-विक्री करणाऱ्यांच्या मुस्क्या आवळायला सुरूवात केली व लाखो रुपयांचा मांजा जप्त करण्यात येत आहे.याकरीता पोलिस विभागाची जेवढी प्रशंसा कराल तेवढी कमी आहे.कारण मकरसंक्रांतीला एक महिना वेळ आहे तरीही आतापासून नायलॉन मांजाधारी मैदानात उतरले आहेत त्याच पध्दतीने पोलिस विभागाने आपल्या कायद्याची धार मजबुत करून लाखोंचा मांजा पकडल्याचे दिसून येते. नागपूरात सर्वाधिक नायलॉन मांजाची आवक उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते आणि येथुनच महाराष्ट्राती अनेक भागांत पुरवठा केला जात असावा. म्हणजेच नायलॉन मांजा धोका अजुनपर्यंत संपलेला नाही. त्यामुळे नायलॉन मांजावर बंदी असुन सुद्धा विक्री होवू शकते याला नाकारता येत नाही. याचे जिवंत उदाहरण सर्वांसमोर आहेच.नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्षांसाठी जीवघेना व घातक आहे त्यामुळे नायलॉन मांजाचा बहिष्कार सर्वच स्तरातून होने अत्यंत गरजेचे आहे.संक्रांत म्हटली की पतंग आलीच पतंगी शिवाय संक्रांत अधुरी असल्याचे लहान मोठ्याना वाटत असते. परंतु काही नागरिक व मुलं यांनी जर चुकीचा मार्ग अवलंवीला किंवा निष्काळजीपणा केला तर मोठ्या प्रमाणात जिवीत हानी होते याला नाकारता येत नाही. नायलॉन मांजाच्या बंदीबद्दल गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक संघटना, संस्था,पोलिस प्रशासन, सोशल मीडिया, वृत्तपत्रे आवाज उचलत आहे आणि गेल्या १० वर्षात अनेक दुर्घटना होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत हानीसुध्दा झाल्याचे सर्वांनाच ग्यात आहे.यात काहींना आपला प्राण सुध्दा गमवावा लागला. कायद्याच्या माध्यमातून मागील पाच वर्षापासून नायलॉन मांजावर पुर्णतः बंदी घालण्यात आली आहे.तरीही राज्यात सध्याच्या परिस्थितीत नायलॉन मांजा विक्रीला येण्याची चिन्हे दिसत आहेत. मागील वर्षी नायलॉन मांजामुळे नागपुरमध्ये ३०० हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात व पशुपक्षांच्या ६०० हुन अधिक दुर्घटना झाल्याचे निदर्शनास आले.यावरून आपण समजू शकतो की संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला आणखी कीतीतरी भयावह घटना झाल्या असाव्यात. त्याचप्रमाणे मागीलवर्षी गुजरातमध्ये पतंगबाजीमध्ये ८०० हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात यात छतावरून पडुन १०० हुन अधिक घायल झालेत व १० जनांचा मांजाने गळा कापुन मृत्यू झाला अशा भयानक घटना नायलॉन मांजामुळे राज्यासह देशातील वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या आहेत.मागील वर्षी दिनांक २४ डिसेंबर २०२३ रविवारला दिंडोशी पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई(बीट मार्शल)म्हणून काम करीत असलेल्या समीर जाधव हा शिपाई ड्युटीवरून मोटारसायकलने वरळी येथील घरी जात असताना मांजाने गळा चिरला व त्यांचा इस्पितळात मृत्यू झाला असे भयावह प्रकार नायलॉन मांजामुळे दरवर्षी होत आहे.म्हणजेच यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रातील नायलॉन मांजाच्या दुर्घटना कमी न होता वाढतच आहे. त्यामुळे पतंगीच्या नादात जीवीत हाणी केव्हाही ओढावु शकते याला नाकारता येत नाही.त्यामुळे सावधगिरीचे उपाय म्हणून घरातील परिवाराने व मुख्यत्वे करून पालकांनी डोळ्यात तेल घालून मुलांवर करडी नजर ठेवण्याची गरज आहे.कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता नायलॉन मांजाचा बहिष्कार अत्यंत आवश्यक आहे.या भयानक घटनेमुळे नायलॉन मांजाला जिवघेना मांजाच म्हणावा लागेल.भारतात अनेक भागात नायलॉन मांजामुळे मानवी व पशुपक्षांच्या हजारो दुर्घटना दरवर्षी होत असतात. एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर विजेचे तार एकमेकांवर आदळतात व त्याचा स्पार्क होतो अशा वेळेस पतंग उडविणाऱ्याला कदाचित आपला प्राणसुध्दा गमवावा लागतो.त्यामुळे मी सर्व पतंग शौकीनांना विनंती करेल की नायलॉन मांजाला टाटा बाय बायकरून कॉटनच्या धाग्याने पतंग उडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.सर्वांना माहीत आहे की दरवर्षी नायलॉन मांजामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी, मोठ्या दुर्घटना व वेळप्रसंगी यात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागतात. त्याच प्रमाणे अनेक पशु - पक्षांनासुध्दा आपले प्राण गमवावे लागतात.पक्षांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती अत्यंत गंभीर,भयावह व बिकट आहे.कारण आज वाढत्या प्रदूषणामुळे त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे. पक्षांना हवेत जास्त वेळ रहावे लागते. त्यामुळे त्यांना प्रदुषणाचा व आता नायलॉन मांजाचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागतो. संक्रांतीच्या शुभपर्वावर नायलॉन मांजामुळे पक्षांची जिवीत हानी होणार नाही याची काळजी व जबाबदारी आतापासूनच जनतेने घ्यावी. पोलिस विभाग याबाबत सतर्कता बाळगुन लाखो रुपयांचा नायलॉन मांजा जप्त करून योग्य कारवाई करीत आहे. परंतु जनतेनीही पोलिस विभागाला संपूर्ण सहकार्य केले पाहिजे.नायलॉन मांजा हा मांजा नसुन जहरीली तलवारआहे कारण आपला किंवा पक्षांचा गळा कळत न कळत केंव्हाही कापु शकते.मागील वर्षी अनेकांचा मांजराने गळा कापल्या गेला यात ते गंभीर जख्मीसुध्दा झालेत. त्यामुळे पतंग उडविताना सावधगिरीने पतंग उडवावी व नायलॉन मांजाचा बहिष्कारकरावा. पतंग उडवा परंतु जीवाशी खेळु नका यातच सर्वांचा आनंद आहे. कारण छोटीशी चूक मोठी दुर्घटना ओढावू शकते याला नाकारता येत नाही. संक्रांतीचा आनंद अवश्य घ्यावा! परंतु जिवावर बितण्यालायक कोणतेही कृत्य होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी.यातच सर्वांचा आनंद आहे. कायदा व पोलीस विभाग आपले कार्य मोठ्या शिताफीने आणि ताकदीनिशी करीत आहे.परंतु आपणच तटस्थ रहालो तर नायलॉन मांजावर अवश्य मात करू शकतो याला नाकारता येत नाही.सध्याच्या अत्याधुनिक युगात नायलॉन मांजाची विक्री ऑनलाईनेसुध्दा होवू शकते.मकरसंक्रांतीच्या पाश्वभूमीवर प्रशासन आतापासूनच प्लास्टिक पतंग आणि नायलॉन मांजा जप्तीची कारवाई युद्ध पातळीवर करीत आहे यात शंका नाही. सरकारने ऑनलाईन नायलॉन मांजावरील विक्रीवर बंदी आणायला हवी.अशा कठीण परीस्थितीत नायलॉन मांजाला रोखण्यासाठी प्रशासनापेक्षा समाजाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.तेव्हाच नायलॉन मांजा हद्दपार होवु शकतो. याकरिता प्रशासन व आमजनता यांच्यात समन्वय असने गरजेचे आहे. यावर सरकारने जातीने लक्ष दीले पाहिजे व जनतेनीसुध्दा यावर लक्ष ठेवण्याची अत्यंत गरज आहे. पालकांनी आतापासूनचआपल्या मुलांना नायलॉन मांजा पासुन दुर ठेवण्याचा काटेकोरपणे प्रयत्न करावा व नायलॉन मांजराचे दुष्परिणाम समजून सांगावे. सरकार व पोलीस विभाग यावर लक्ष ठेवुन आहे. परंतु नागरिकांचेसुध्दा कर्तव्य आहे की जी वस्तु घातक आणि जिवघेनीआहे आणि ती आपण रोखु शकतो ती रोखलीच पाहिजे.यामुळे अपघातावर आळा बसेल व पशुपक्षांचे प्राण वाचतीलपतंगीचा आनंद भरपूर घ्या.परंतु नायलॉन मांजाला हद्दपारकरा. नायलॉन मांजा बद्दल नागरिक सतर्क रहाले तर नायलॉन मांजराची विक्री होणारच नाही व प्रशासनाला कारवाईची गरजसुध्दा भासणार नाही. त्यामुळे नागरिकांनी सर्वप्रथम सतर्क रहाने गरजेचे आहे. नायलॉन मांजामुळे होणारे अपघात सांगुन येत नाही ते केंव्हाही कधीही होवु शकतात. त्यामुळे नायलॉन मांजाला रोखण्याचे काम सर्वप्रथम नागरिकांचे आहे,मग प्रशासनाचे राहील.दोर पतंगाची कापायची की आयुष्याची हे आपल्यालाच ठरवावे लागेल आणि नायलॉन मांजाचा वापर नकोच ही पालकांना जबाबदारी पाळावी लागेल.सावधगिरीचे उपाय म्हणुन मी सांगू इच्छितो की मुलांनी कटलेल्या पतंगीच्या मागे धावु नये,वाहन चालकांनी कटलेल्या पतंगीच्या धाग्यापासुन सावधानी बाळगावी.सर्व अपघात टाळा मानव व प्राणीमात्रांचे प्राण वाचवा.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**(माजि विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

### श्रीक्षेत्र गोंदी येथे श्रीदत्तजयंती महोत्सवाची सांगता

# युवा कौशल्य गुणगौरवाद्वारे तरुणांचा सत्कार

**श्रीक्षेत्र गोंदी । प्रतिनिधी -** येथे गेल्या तीन दशकांपासून सुरू असलेल्या श्रीदत्तजयंती महोत्सवाची सांगता अध्यात्म रत्न ह.भ.प. प्रकाश महाराज गोंदीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. या प्रसंगी महाप्रसाद घेण्यासाठी गोंदी परिसरातील भाविक भक्त बहुसंख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी ग्रामीण भागातील होतकरू व कुशल युवकांना प्रोत्साहन म्हणून युवा कौशल्य गुण गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यात गोंदी येथील प्रगतिशील युवा शेतकरी श्यामसुंदर जगदीश जहागिरदार याचा महात्मा फ ुले कृषी विद्यापीठ राहुरी येथून कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान म्हणून ओळखल्या जाणार्या ड्रोन टेक्नॉलॉजीचे विशेष प्रशिक्षण घेवून आल्या बद्दल विशेष गुणगौरव करण्यात आला. या प्रशिक्षणासाठी जालना जिल्ह्यातील केवळ दोन युवकांची निवड झाली होती, त्यापैकी गोंदी येथील या युवकाचा निवड झाली होती असे त्याने मनोगत व्यक्त करतांना सांगितले.

तसेच मराठवाडा कीर्तन महोत्सव या उपक्रमा अंतर्गत श्रीक्षेत्र आयोध्या येथे कीर्तन सेवा व अन्य धार्मिक सेवा देवून आलेल्या ह.भ.प.सुहास पद्माकर रामदासी यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. श्रीदत्त जयंतीनिमित्त गोंदी येथील दत्त मंदिरात सामुदायिक दासबोध पारायण, श्रीगुरुचरित्र अनुष्ठान,विष्णुसहस्त्रनाम-गीतापाठ, दत्तपंचपदी , श्रीमद्भागवत कथा, नित्य हरिपाठ भजन, मराठवाडा कीर्तन महोत्सव आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात ह.भ.प. प्रदीप महाराज मुळे गोंदीकर यांनी श्रीमद्भागवताच्या षष्ठ स्कंधाचे भावपूर्ण विवेचन केले. तसेच मराठवाडा नारदीय कीर्तन महोत्सवात ह.भ.प. सुहासबुवा रामदासी, ह.भ.प. योगीराजबुवा मुळे, ह.भ.प. श्रीपादबुवा मुळे आदी युवा कीर्तनकारांनी नारदीय कीर्तनसेवा समर्पित केली. यासाठी श्रीपाद मुळे, सुहास रामदासी,

अरविंद मुळे (बीड) यांनी संवादिनी तर प्रमोद धर्माधिकारी यांनी तबला साथसंगत केली. सांगतेनिमित्त गोंदी येथील श्रीगुरुदत्तधाम येथे विराजमान असलेल्या जगातील एकमेव श्री पुष्कराज दत्तमूर्तीस विविध भक्तगणांनी रुद्राभिषेक केला तसेच श्रीराम संस्थान साडेगाव चे महंत प.पु. सुरेश महाराज रामदासी यांची पाद्यपूजा करण्यात आली. यावेळी गोंदी परिसरातील बहुसंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

सात दिवस चाललेला हा उत्सव यशस्वी करण्यासाठी श्रीगुरुदत्तधाम परिवरातील दत्तात्रेय गोंदीकर, श्याम जाहगिरदार, प्रमोद रामदासी, सुहास रामदासी, भरत राम दासी, श्रीपाद पाटील, संकेत सोळुंके आदी सर्व सदस्यांनी अपार परिश्रम घेतले. याबद्दल श्रीगुरुदत्तधामचे विश्वस्त श्रीपाद मुळे, तथा कार्यवाह योगीराज मुळे गोंदीकर यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.



# भूमिपुत्रांचा शालिग्राम म्हस्के यांच्या हस्ते गौरव



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील वैभव सातभाई व रोहन भागवत यांचा जिल्हा परिषद सदस्य शालिग्राम पाटील म्हस्के यांच्या हस्ते गौरव करण्यात आला, गौरव कर्तृत्वाचा, सन्मान भूमिपुत्रांचा! अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करत जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उत्तुंग यश प्राप्त केल्याबद्दल आज जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील युवकांचा त्सत्कार केला. यावेळी चि.वैभव दत्तात्रय सातभाई व चि. रोहन भागवत खरात यांची (CSIF ) म्मध्ये निवड झाल्याबद्दल त्यांचा व टेंभुर्णी ग्रामपंचायत येथे सत्कार करून अभिनंदन केले. याप्रसंगी टेंभुर्णी येथील माननीय आमदार संतोष पाटील दानवे यांचे सहाय्यक उद्धव दूनगहू, विजय परीहार, सरपंच गौतम मस्के, उपसरपंच शिवाजी मुळे,जमदाडे, राजू खोत, संदीप मुळे, खळसे, रंजीत जाधव, प्रदीप मुळे, मनोज पंडित, गोपाल गायके भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.